I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 300-305
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# कोविड – १९ चा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम

प्रा. सुप्रिया रा. सादलवार

वाणिज्य विभाग
डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर
*Corresponding Author: Supriyasadalwar2@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

प्रस्तुत विषयात चारशे वर्षाचा इतिहास लक्षात घेतला तर प्रत्येक शंभर वर्षाने जागतिक पातळीवर दुर्धर आजाराने हाहाकार माजविला. त्यात कोटिंच्या घरात नागरिक दगावले आहे. २०१९–२० मध्ये कोरोनारूपी आजाराने थैमान घातले. आजपर्यंत जगात कोटींमध्ये तर देशात लाखात नागरिकांचा कोरोनाने मृत्यू झाल आहे. १७२० मध्ये प्लेग आजाराने जगात थैमान घातले होते अनेक लोक मृत्युमुखी पडले, १८२० मध्ये कॉलरा आजार समोर आला. त्यात भारत, जपान, अरब देशांसह चीन अशा जगातील विविध देशांना कचाटयात घेतले. १९२० च्या काळात फ्लूची लागन जगातील विविध देशातील लोकांना झाली. त्याची सुरूवात १९१८ मध्ये झाली. १९२० मध्ये उग्ररूप धारण केले. २०१९ पासून चीन देशातून जगाच्या वेगवेगळया देशात कोरोनाचा प्रसार झाला. व आजही देशात कोरोनाचा थैमान सुरूच असून, मृत्यूदराचा आकडाही वाढला आहे. याचा परिणाम सर्वच क्षेत्रात झाला असून ग्रामीण भागाला जास्त झळ पोहचली. सर्वच शेतकऱ्यांना जवळ स्वत:ची जमिन असते असे नाही तर काही मजूरी वर काम करून जगतात. त्यामुळे रोजगार , खायला अन्न नाही, मालाला किंमत नाही, अशी परिस्थितीचा सामना ग्रामीण अर्थव्यवस्थेला करावा लागला.

**बीजशब्द :** ग्रामीण विकास, रोजगारसंधी, सरकारी धारेण.

**प्रस्तावना :**

भारत देश हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील ७० ते ८० जनता शेती हा व्यवसाय करतात. शेती व्यवसायापासून अनेक उद्योग निर्माण झाले. ऊस, टमाटर, फळे, भाजी अश्या प्रकारच्या मालावर प्रक्रिया ही कारखान्यात करून त्याची विक्री केली जाते. ग्रामीण भागात शेती हे उपजिविकेचे साधन आहे.

पूर्वी परंपरीक पद्धतीने शेती केली जात असे आणि आजही बरेच शेतीकरी याच पध्दतीने शेती करत आहे. याला कारण म्हणजे ग्रामीण क्षेत्राचा विकास आजही पाहिजे तस झाला नाही. त्यांच्यापर्यंत आधुनिक पध्दती पोहचल्या नाही. याला कारण म्हणजे त्यांचा अशिक्षित पणा नविनी करणाचा अभाव म्हणून ते मागे आहेत. त्यातल्यात त्यात गावात सावकार त्यांच्या जमिनीवर कर्ज देतात. त्यावरिल व्याज जास्त असते. शेतमालाचे उत्पादन झाल्यानंतर खर्चवजा ती रक्कम उरते ती सावकारांना व्याज देण्यात जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनवर कर्जाचं डोंगर वाढतच जाते. या जाचक सावकाराच्या कर्ज मध्ये इतके अडकून पडतात की, बाहेर निघणे कठिण होते. कर्जाच्या ओझ्याखाली दबल्या मुळे शेतकरी आत्महत्या करतात. ज्या बातम्या वाचण्यात येतात.तसेच शेतकऱ्यांना सुधारित बी–बीयाणे, रसायणिक खते, सिंचन व्यवस्था या सुविधांची माहिती मिळत नाही किंवा, ते या नवीन पध्दती स्वीकारत नाही. किंवा ती स्वीकारण्याकरीता त्यांच्याकडे पैसा उपलब्ध नाही. या सर्व कारणामुळे शेतीत पाहिजे तसे उत्पन्न मिळत नाही. सरकाराचे धोरण शेतकऱ्यांनविषयी चांगले असेल, अनेक योजना राबविल्या गेल्या असेल तरी सुध्दा त्या प्रत्यक्ष त्यांच्यापर्यंत पोहचत नाही, किंवा पोहचल्या तर त्याचा लाभ त्यांना कमी मिळतो म्हणजे सरकारकडून मंजूर झालेल्या निधीमधून अगदी निम्या निधी त्यांना मिळतो. मधली जी व्यवस्था आहे. या व्यवस्थेमुळे शेतकरी पिळला जातो आहे. अश्या या शेतकरी जो आपल्या अन्नधान्याचा पुरवठा करतो. त्यांच्याशिवाय आपण जगू शकणार नाही. जे सतत शेतात राबतात म्हणून आपण आहोत.

जर आज आपण विचार केला की मी अन्नधान्यशिवाय राहू शकतो. आम्ही फळ खाऊ किंवा कंदमुळे खाऊ पण हे पिकविणारे शेतकरीच आहे जे अहोरात्र मेहनत करतात. म्हणजे त्यांना त्याचे पिके वाचवयचे असेल तर अनेक प्राणी यांच्यापासून संरक्षण करण्याकरीता ते रात्री जागतात. स्वत:ची झोपमोड करणे

दिवसभर मेहनत करून जे पिक शेत उगवते ते पिक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर एक स्मित हास्य निर्माण करते. अगदी छोटया बी पासून त्याला मोठ होतांना पाहालं जाते. एखादया लाहान बाळाल आई जशी मोठ होतांना पाहाते त्याचप्रकारे शेतीकरी बी पेरणी पासून तर ते प्रत्यक्ष तयार होतांना बघतांना एक वेगळाच आनंद अनुभवतात. अश्या या शेतकऱ्यांचा देशाच्या विकासामध्ये मोठा हातभार आहे त्यापासून अनेक प्रक्रिया करून उत्पादन निर्माण केलं जाते.

कापसापासून कापड, ऊसापासून साखर, टमाटर पासून सॉस, फळांचा ज्युस असे एक न अनेक उत्पादने शेतीपासून निर्माण केली जातात.

शेतीचे एवढे महत्व असतांना ग्रामीण भागात सुविधाचा अभाव, शिक्षणाचा अभाव, नविनीकरणाचा अभाव आपण पाहातो.

कर्ज घेण्याकरीता ग्रामीण बॅंक निर्माण झाल्या हा शेती सुधारकरणांच नविन पाहुल सरकार कडून उचल्या गेले नवीन योजना राबवून शेती करण्याच्या नवीन पध्दतीचा वापर करून उत्पन्न कसं वाढवता येईल याकडे लक्ष वेधल्या गेले आहे.

देशात येणाऱ्या विविध समस्यांचा प्रभाव ज्याप्रकारे उद्योगांचे व समाजावर पडतो त्याच्याप्रकारे या ग्रामीण भागावर पडतांना आपण पाहतो. जगामध्ये सर्वत्र माहामारीचा प्रकोप आला.

तो सर्वांनी अनुभवला या माहामारीची झळ सर्वत्र पसरली. लहान–मोठे उद्योग, सर्वच क्षेत्र त्यात होरपळून निघाले. कुटूंब मध्ये दु:खच डोंगर पसरलं सर्वत्र जीवनाविषयी अस्थिरता पसरली. अगदी भितीदायक वातावरण होतं. अश्या परिस्थितीत सरकारकडून वेळोवेळी अनेक उपाय (परिस्थिती हाताळण्याकरीता) केली जात होती. सर्व अर्थव्यवस्था ठप्प झाली. शहरे ओस पडली. वरदळ थांबली शुकशुकाट झाला अश्यावेळी ग्रामीण भाग सुध्दा त्यातून सुटल नाही.

सुरूवातीला शेतीत झालेले पिकाची कांपणी करायला माणसं मिळत नव्हती झालेले. फळे, पिके हे तिथल्या तिथे घराब होत होती. उत्पन्नाच्या प्रमाणापेक्षा खर्चाचे प्रमाण वाढले.

वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या, शेती व्यवसाय कसे नुकसानीत आहे. कारण पिक झालेल्यानंतरही ते स्थानिक ठिकाणी पिकवे लागे जी किंमत मिळेल त्या किंमतीत तसेच शहरात ग्रामीण भागात सिमापार जाणे बंद केले. (सिमा लॉक) अश्यातच सर्वसाधारण लोकांवर उपासमारीची पाळी आली. दोन वेळ नाही तर एक वेळ जेवण मिळत नव्हते. अनेक संस्थांनी या माहामारी च्या काळात मदत केली. सामाजिक संस्था काही श्रीमंत व मध्यम लोकांच्या मदतीने गरिब व गरजू लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करित होते.

कोविड–१९ च्या काळात ग्रामीण जो शेतीवर अवलंबून असतो. त्यांच्या हातात पैसा नसल्यामुळे शेतीकरीता लागणारे बि–बियाणे व कामकरणाऱ्या माणसाच्या अभावामुळे शेती व्यवसाय हा कमी प्रमाणात केला गेला किंवा काहींना काहीच काम मिळाले नाही. सर्व घरी बसून परिस्थिती सुधारण्याची वाट पाहात होते. शेती उत्पादन नाही गावात माहामारी पसरली एका कुंटूबात एकाल झालं तर घरात सर्वांना त्या माहामारीचा त्रास व्हायचा खायला अन्न नाही. रोजगार नाही. ग्रामीण भागात सर्वांच्या वाटयाला जमीन आहे. असं नाही. तर बरेच जणं मजुरीवर अवलंबून आहे. माणसे मिळाले तर त्यांना मजुरी देण्याकरीता पैसा नाही अशी परिस्थिती ज्यांच्याकडे पैसा आहे. तर कामाला माणसं नाही यामुळे दिवसेंदिवस परिस्थिती बदलत गेली.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे महत्त्व**

भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे. स्वातंत्र्यपूर्व काळानंतर कृषी वरील अवलंबित्व सध्या कमी झाले आहे. मात्र एकंदर देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी कृषी क्षेत्राचा विकास महत्त्वाचा आहे.

१. राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा – स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी कृषी व संलग्न क्षेत्राचा जीडीपी मधील हिस्सा ५० टक्यांहून अधिक होता. त्यांनतर तो घसरून गेला. कृषी क्षेत्रातील जीडीपी मधील वाटा कमी होणे म्हणजे अर्थव्यवस्थेतील सकारात्मक, संरचनात्मक बदलाचे घोतक आहे. तसेच विकसित राष्ट्रमध्ये कृषी क्षेत्राचा वाटा तीन ते चार टक्यापेक्षा कमी असतो.

२. रोजगार निर्मिती – भारतात जास्तीजास्त लोक कृषी व्यवसाय करतात. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतातील ७० टक्याहून अधिक लोक कृषी व संलग्न क्षेत्रावर प्रत्यक्षत आणि अप्रत्यक्षरित्या अवलंबून आहे.

३. परकीय व्यापारातील योगदान – भारतातील लोकांचा व्यवसाय शेती असल्यामुळे अनेक कृषी उत्पादने निर्यात केली जातात. भारत जगातील प्रमुख १५ कृषी वस्तूंच्या निर्यातक देशांमध्ये गणला जातो.

४. कच्या मालाचा पुरवठा – भारतीय शेती विविध उद्योगांना कच्या मालाचा पुरवठा करतात. यामध्ये ऊस, कापूस, तेलबिया, रबर यासारखी उत्पादने कृषी क्षेत्राकडून उद्योग क्षेत्रांना पुरवले जातात.

५. अन्नपुरवठा – भारतीय शेती भारतातील वाढत्या लोकसंख्येला अन्नपुरवठा करण्याचे कार्य करते. भारत

सरकारने कृषी विकासाचे धोरण प्रामुख्याने अन्न उत्पादनात स्वयंपूर्णता व स्वालंबन प्राप्त करण्याच्या अनुषंगाने अवलंबले गेलेले आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी मध्ये आदान साधनांचे महत्त्व.**

१. बियाणे – कृषी उत्पादनासाठी उच्च दर्जाच्या बियाण्यांचा वापर महत्त्वाचा आहे. इतर आदानांची कार्यक्षमता बियाण्यांच्या गुणवत्तेनुसार परिणाम करत असते. भारतीय बियाण्यांच्या संदर्भात राष्ट्रीय बियाणे महामंडळ व भारतीय राज्य फार्म महामंडळ व राष्ट्रीय संस्था आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ याल माहाबीज असे देखील म्हटले जाते. याचे मुख्यालय अकोला येथे आहे.

२. खते – पिकांना आवश्यक असलेली पोषकद्रव्ये कृत्रिमरित्या देण्यासाठी खतांचा वापर होतो. यामध्ये रासायनिक खते, सेंद्रिय खते, हिरवळीची खते आणि जैविक खते यांचा समावेश होतो. भारतीय कृषी मध्ये रासायनिक खतांनी महत्तवाची भूमिका पार पाडली.

३. सिंचन – भारतात सिंचनाचे प्रमाण २०१४–१५ च्या आकडेवारीनुसार २०१७च्या कृषी अहवालानुसार ४८.६ टक्के आहे. देशातील जल संसाधनांच्या विकासाठी राष्ट्रीय जल निती २००२ धोरण आखण्यात आले. भारताची सरासरी वार्षिक जल उपलब्धता १८६९ अब्ज असून त्यापैकी वापरता येण्याजोगी जलसंपदा ११२३ अब्ज घनमिटर आहे. सिंचनाच्या विकासाठी लाभक्षेत्र विकास कार्यक्रम गतिमान जलसिंचन लाभ कार्यक्रम सुक्ष्म सिंचन योजना यासारखे कार्यक्रम राबवले गेले.

४. वित्तपुरवठा – भारतीय शेता क्षेत्राचा विकास घडवून आण्याकरीता आधुनिक तंत्रज्ञाना व प्रभावी कार्यपध्दती राबविण्यासाठी वित्तपुरवठयाची नितांन आवश्यकता असेल. वित्ताची गरज भागवण्यासाठी संस्थात्मक व गैर संस्थात्मक स्त्रोताच्या माध्यमातून प्रयत्न केले गेले. तसेच कर्ज हे अल्पकालीन, दीर्घकालीन, मध्यमकालीन अशा विविध प्रकारच्या कर्जाची आवश्यकता असते. यासाठी व्यापारी बॅक सहाकरी बॅक, प्रादेशिक ग्रामीण बॅक, वित्तपुरवठा यासाठी कार्यरत आहेत. कृषी ग्रामीण विकासाठी नाबार्ड राष्ट्रीय संस्था देशातील ग्रामीण विकासाला उत्तेजण देणारी महत्त्वाची संस्था आहे.

शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळवून देणे आणि ग्राहकांना योग्य किमतीत वस्तू मिळण्याची व्यवस्था करणे हा कृषिमूल्य नीतीच्या मुख्य उदेश आहे. तसेच कृषीनीती व अन्न व्यवस्थापन हे, शेतकऱ्यांनकडून योग्य भावाल अन्नधान्याची प्राप्ती आणि ग्राहकांना, दुर्बल घटकांना योग्य भावात अन्नधान्याचे वितरण, अन्न सुरक्षा व किंमत स्वैर्यासाठी साठा राखणे हे उद्दिष्ट आहेत.

**भारतीय शेतीवर परिणामः–**

कोरोनाच्या प्रादुर्भाव अगोदर भारतीय कृषी अर्थव्यवस्था ही अन्नधान्याच्या किंमतीच्या बाबत लक्षणीय वाढ अनुभवन होती. मात्र कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर भारतीय कृषी अर्थव्यवस्था हि अन्य धान्याच्या किंमती बाबत घसरण न होता त्यांच्या किंमतीत वाढ हात असतांना दिसुन येते जानेवारी २०२० पर्यंत हा दार २०१३–१४ ला असणारा उच्चांकएवढा गेलेला होता. कोविड–१९ विषाणु महामारीच्या संकटामुळे एकुणच घट झाल्याने अन्नधान्य चलनवाढीचा दबाव कमी होईल. असे मुल्यांकन आरबीआय नी केले.

अनेक कारणामुळे गहू, द्राक्षे, तांदुळ, टरबुज, केळी, मेथी, चणा, कापूस मिरची, हळद जिरे, कोथिंबर, कांदा आणि बटाटे अशा शेती पिकाची खरेदी–विक्री करण्यासमोर अनेक प्रश्न निर्माण झाले. त्याच बरोबर शेतमालाच्या किंमती कमी झाल्या होत्या.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांना एकदाही पिक घेता आले नाही किंवा पिक आपल्या शेतातच सोडून द्यायची वेळ त्यांच्यावर आलेली होती. याच काळात मागणी घटल्याने द्राक्षे उत्पादकांना महामारीच्या संकटामुळे जवळपासू १००० कोटी रूप्याचा शेतमालाचा तोटा सहन करावा लागला. आता मात्र या वस्तूचे भाव वाढलयाने त्या वाढत्या किंमतीचा लाभ शेतकऱ्यांना न मिळता, तो पोल्ट्री व्यवसायाचा समावेश जिवनाश्यक गोष्टीमध्ये केला गेला असूनही शेतकरी घाबरून जावुन अत्यंत कमी किंमतीत त्याची विक्री करीत आहेत.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. आजही भारतात काही परंपरागत व्यवसाय सुरू आहे. आणि बदलत्याकाळानुसार त्यामध्ये बदल होत आहे.

आज ग्रामीण भागामध्ये आधुनिक सांधनांचा वापर वाढला आहे. त्याला काही पूरक व्यवसाय आहे. आणि त्यानुसार रोजगार निर्मीतीला चालना मिळाली.

तर दुसरीकडे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे रोजगाराकरीता जाणाऱ्यांचा कल दिसतो. या स्थलांतरामुळे शहरात मध्ये गर्दी वाढलेली आहे. त्याच बरोबर शहरात औद्योगिक विकासाला चालना मिळाली तसेच बांधकाम व्यवसायात मोठयाप्रमाणात वाढ झाली. रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

खऱ्या अर्थाने भारत हा खेडयांचा देश आहे. आणि ग्रामीण विकासात खेडयाचा विकास समावलेला आहे. अस

कितही म्हटल तरी प्रत्यक्षा अशी पावल टाकल्या गेली नाहीत. परिणामी संपूर्ण ग्रामीण विकासचं स्वप्न अजूनही प्रत्यक्षात आलेली नाही. त्यातच शेती व्यवसाय अडचणीत येत आहे. म्हणजे शेती हा निसर्गावर अवलंबुन आहे पाऊस पडला तर पिक तो वेळेवर पडला तर पण अकाली पाऊस, हे शेत पिकाला नुकसान पण पोहचविते. सर्वेच शेतकऱ्यांना भांडवलाचे पाटबळ नसते. त्यामुळे आजच्या आधुनिक जगात शेती हा आधुनिक पध्दतीने करतांना भांडवल आवश्यक असते. सुधारित बि–बियाणे, फवारणी, खते, सिचंनाची सुविधा अश्या घटकांचा वापर करताना मोठया भांडवलाची आवश्यकता असते परंतू हे भांडपवल त्यांच्याकडे नसते.

गेल्या २५ मार्चपासून देशात लागु झालेल्या टाळेंबदीचा ग्रामीण भरतातील अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाल. अनेकांचे रोजगार गेले. ग्रामीण भागात बऱ्याच लोकांचे उदरनिर्वाह हा शेतीवर अवलंबुन आहे. त्यांचे खूप हाल झाले.

देशामध्ये सर्वाधिक रोजगार शेतीक्षेत्राशी निगडीत आहेत. म्हणजे देशात जेवढी केवढी श्रमशक्ती अस्तित्वात आहे. त्याच्या निम्मी श्रमशक्ती ही एखादया शेती व शेतीशी निगडीत क्षेत्रात कार्यरत आहे.

देशातील ८५ टक्के शेतकऱ्यांकडे अडीच हेक्टर पेक्षाही कमी जमीन आहे. हीच जमीन ते कसतात त्यावर पिक घेतात आणि त्यावर कुटुंबाचे पालनपोषण करतात ९० लाखाहुन अधिक मच्छिमारांचा उदरनिर्वाह थेट मासेमारीवर अवलंबुन आहे त्यातील ८० टक्के मच्छिमारांचे उत्पन्न जेमतेम आहे. मच्छिमारी क्षेत्र. एक कोटी ४० लाख लोकांना रोजगार पुरवते.

हाततोंडाशी आलेले रब्बी पिक शेतात उभे होते. परंतू ते पिक काढणीला मजूर मिळत नव्हते. टाळेंबंदीमुळे सर्व व्यवहार ठप्प झाले. पिक कापणीकडील ट्रॅक्टर्स मिळणे, थ्रेशर्स, हविस्टर्स यांसारखे यंत्रे मिळणाशी झाली. मालवाहतुक ठप्पे झाला. लोकांना आपले क्षेत्र सोडून दुसरीकडे जाता येत नव्हते त्या भागात जे मिळेल त्यावर समाधान माणुन त्याचा उपयोग करायचा हे सर्वसामान्याठी होते. शेतकऱ्यांना ज्या ठिकाणी राहतात त्याच ठिकाणी मिळेल त्या किमतीत माल विकावा लागे फळे, भाजीपाला, आणि फुले यासारख्या नाशवंत पिकांचे उत्पादक तर तोटयात गेले. त्यांच्या मालाला उठाव नाही. हाती असलेल्या माल कवडी मोल विकावा लागे.

या परिस्थितीचा फायदा दलाल किंवा अडते घेत होते. शेतकऱ्याकडुन कमी किंमतीत माल खरेदी करायलचा नी तो किरकोळ व्यापाऱ्याला जास्त किमतीला विकणे या मध्ये सर्वसामान्य जनते भरडली जावु लागले. फळांच भाजीपाल्याचे भाव वाढलेले आधीच उत्पन्न कमी झाले, पण जीवनाश्यक खरेदी करावीच लागे. कारण समाजात हा भ्रम पसरविल्या गेल्या जाहिरातीद्वारे तसेच सर्वसामान्यच्या तोंडुन की तुमची शारिरीक क्षमता वाढवायची असेल तर चांगल खा कि ज्यामुळे तुमची शरीर, येणाऱ्या परिस्थितीचा सामना करू शकेल.

त्याकरीता फळे, भाजीपाला यांचे किंमती वाढल्या असतांना खरेदी करीत होते.

तामिळनाडुतिल अनेक शेतकरी नगदी पिक म्हणुन फुलांचे उत्पादन घेतात. मात्र प्राप्त परिस्थितीत त्यांनाही नुकसान सहन करावे लागले करोना विरहित परिस्थिती असती तर याच शेतकऱ्यांनी फुलांच्या शेतीतून लाखांनी उत्पन्न घेतले असते केरळ आणी तामिळनाडूमध्ये पिंकाचा लागवडीवरही टाळेबंदीचा परिणाम झाला आहे. वाहतूकीच्या अभावामुळे शेतावर मजुरी करून उदरनिर्वह करणाऱ्या कामगारांनाही हातावर हात ठेवुन बसावे लागले. तसेच माहात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंर्गत होणारी कामेही ठप्पा आहेत.

अंडयाच्या व्यवसाय बंद पडण्यावर येवून ठेपला होता. समाजात असा भ्रम झाला होता की, अंडे खाल्यामुळे कोरोना होतो. बऱ्याच ठिकाणच्या बातम्या ऐकल्या नी व्यापारांनी अंडी मोठयाप्रमाणात फेकुन दिली म्हणजे ज्यावेळी काही विचार करण्याची क्षमता थांबुन गेली त्यावेळी या माहामारी होण्याकरीता कोणते कारण आहे. याचा तर्क सर्वचजण आपआपल्या पदध्दतिने करू लागले. आणि काही कालावधी करीता अंडयाच सेवन बंद झालं होते म्हणुन अंडी व्यवसाय सुध्दा बंद पडला होता.

ग्रामीण भारतात उधार ऊसनवारीवर व्यवहार करणे ही पध्दत दृढ आहे. एखादया बडया सावरांकडुन मोठया व्याजदराने कर्ज घेवून ते नंतर फेडले जात. प्राप्त परिस्थितीवर यात करण्यासाठी अशाच शेतकऱ्यांना सावकार २८ टक्क्यांनी कर्ज देतात ऐकण्यात आले. अडलेनडले शेतकरी सुगीच्या हंगामा नंतर या कर्जाची परतफेड करण्याच्या बोलीवर कर्ज उचलत आहेत. मात्र नाशवंत मालाला बाजारपेठेपर्यंत जायला वाहणचं उपलब्ध होत नसल्याने ते स्थानिक बाजारपेठेतच पडेल त्या किंमतीने विकले जात असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान आणि घेतलेल्या कर्जाचे मोठे हप्ते अशा कात्रीत पकडले आहे.

**समस्या**

महामारीनंतर येणारी माहामारी कही मोठी असणारी शक्यता आहे. ग्रामीण भागात कोरोना काळात मोठी उलथा

पालथ झाली आहे. घरातील व्यक्तीला वाचवता वाचवता गावची गाव कर्जाच्या ओझ्याखाली गेली आहेत.

कोरोना महामारी आल्यापासून ग्रामीण अर्थचक्राला मोठी घसरण झाली आहे. विशेषत: कोरडवाहु परिसरील खेडागावामध्ये अर्थचक्राला सुराळीत करण्याचे मोठे आव्हान आहे. संध्यास्थितीमध्ये कोरोना महामारीतून बाहेर पडणे आणि या बंद पडलेल्या अर्थव्यस्थेला सुरळीत करण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

गेल्या दोन वर्षापासून जशी कोरोना महामारी आली. तेव्हापासून खेडगावातील आर्थिक व्यवहाराला मोठी खिळ बसली आहे. ही खीळ कशी काढायची हा प्रश्न हळुहळु सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

देशाचा विकास साधावयाचा असेल ग्रामीण विकास आवश्यक असतो या माहामारी मध्ये जे ग्रामीण नुकसान भरून काढणे आवश्यक आहे. हे प्रश्न सरकारकडुन सोडविले का? कारण महामारी पूर्वी सुध्दा शेतकऱ्यांना पाहिजे तशी कोणत्याही सूविधा (कर्जाची) मिळात नव्हती अनेक शेतकरी गावातील सावकार किंवा बॅकेकडुन कर्ज घेवून त्यातुन बाहेर पडु शकत नसल्यामुळे आत्महत्या करीत होते.

या महामारीमुळे जी परिस्थिती ग्रामीण जनतेवर उद्‌भवली आहे. जो त्यांच्या शेती हा रोजगार आहे. परंतू पाहिजे तो भाव त्यांना माहामारी मध्ये मिळाल नाही. गावातच त्यांना भाजीपाल विकावा लागत होता.

कधीही एखादया उत्पादकाला अत्पादन घेतल्यानंतर उत्पादीत माल हा योग्य बाजारपेठेत विकल्यास त्यापासून त्यांना जास्त किंमत मिळते. परंतू या महामारीमध्ये अशा बाजारपेठेपर्यंत जावु दिल्या जात नव्हते. म्हणुन ज्या ठिकाणी राहता त्याच ठिकाणी तो माल विकावा अशी परिस्थिती होती. व कमी किंमती शेतकऱ्यांना माल विकावा लागे. शेतकामलाचा उत्पादनाकरीता जो खर्च झाल तेवढीच किंमत जर मिळाल तर आर्थिक नुकसान सहन करण्यापलीकडे शेतकरी काही करू शकत नव्हते. म्हणजेच शेतकऱ्यांची परिस्थिती महामारीपूर्वीची अवस्था आणि महामारी नंतरची अवस्था यात नंतरच्या अवस्थमध्ये फार विस्कळित झाली होती.

दुष्काळी आणि कोरडवाहु परिसरात गावाची आर्थिक बाबतीत काय अवस्था आहे? तपासण्याच्या मुल्यमापन करण्याच्या प्रयत्न होत नाही. कोरोना महामारी आल्यापासून शासनाची खेडेगावाकडे पाहण्याची भूमीका काय राहिलेली आहे. तसेच कोणकोणत्या प्रकारची मदत केली आहे. या बाबतीत कधीच शेतीसंबंधीत समाज घटक, प्रशासन आणि राजकीय नेतृत्व यांच्याकडून आत्मचिंतन, मुल्यमापन होताना दिसून येत नाही.

संपूर्ण देशाच्या इतिहासात साथीच्या रोगाची परंपरा आपल्याला आढळून येते. इ.स. १७२० मध्ये प्लेगच्या रोगाची साथ संपूर्ण जगभर पसरली

**उपाययोजना**

केंद्र सरकारकडुन हळुहळु काही सुट दिल्या गेली. शेतमाल तसेच माशांच्या व्यापारावरिल निर्बंध केंद्र सरकारने मार्चच्या अखेरीस उढवले.

मात्र गशा सवलीती शेतकऱ्यांना पर्यंत पोहचल्या नाही. गरीतब तसेच गरजू लोकांपर्यंत रोख रकमेची सरकारी मदत पोहोचण्यातही अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे अनेक प्रसारमाध्यमांनी त्यांच्या वार्ताहात दाखवून दिले.

गरजुना तातडीची मदत पोहचण्यात स्थानिक स्वराज्य संस्था तसेच स्वयंसेवी संस्था आघाडीवर असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

उदाहरण धायचे झाल्यास एम.एस स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशनचे देता येईल. या संस्थेने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाच्या साहयाने मदतीचा हात दिला आहे. शेतकऱ्यांना पिकाच्या लागवडी विषयी सल्ला देणे फोनव्दारे शेतीविषयक कार्यक्रमाचे आयोजन करणे शेतमालाच्या विक्री साठी मागदर्शन आणि मदत करणे इत्यादी उपक्रम शेतकरी उत्पादन संघाच्या साहयाने या संस्थेतर्फे राबविण्यात येत आहेत. तसेच संस्थेने कोरानाविषय परिस्थितीतून स्वत: ची सुरक्षितता कशी करावी याचे मार्गदर्शन केले.

(उदा. पी.एम.किसान निधीची सध्याची ६००० रूपयाची मर्यादा वाढवून १५,००० रूपया पर्यंत वाढवावी लागेल आणि खरिप क्रगामाच्या आधीच ही रक्कम शेतकऱ्याच्या हाती पडेल. यासाठी प्रयत्न करावे लगातील) सावकाराला आळा घालावे लागेल. तसेची कर्ज घेतले असण्यास व्याज स्थगित देणे. फळे, भाजीपाला, फुले आणि मासे यासारख्या नाशवंत मालामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई करणे माहात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक कामे काढूण अधिकाऱ्यांनकडून लोकांना रोजगार मिळेल, शेतमजुरांना शेतात काम करण्यासाठी प्रोत्याहित करणे इ. उपाय योजना करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देण्याचे काम केंद्र सरकारला राज्य सरकारांच्या साहयाने करावे लागते, हे नक्की.

**संदर्भ :**

कृषी भूगोल :—
प्रा. एस. व्ही. ढाके
प्रा. व्ही. जे. पाटील
प्रा. एस. एन. भारंबे
ग्रामीण व नागरी समाजशास्त्र
प्रा. पी. के. कुलकर्णी
https://www.nitinsir.in/indian-agriculture/
https://www.esakal.com/uttar-maharashtra/nashik/four-hundred-years-of-epidemic-diseases -nashik-marathi-news
कोरोना व्हायरस — एक संकट की संधी दिलीप श. पाटील.
ग्रामिण व नागरी समाजशास्त्र
डॉ. बी. एम. क—हाडे
डॉ. डी.डी. सांबारे — कोविड १९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम.